Estd. 1962
"A++" Accredited
by NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA**
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in,
email- stores@unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४,महाराष्ट्र**
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, भांडार विभाग ०२३१-२६०९०८५/८६

क. शिवाजी विद्या./वर्धापन दिन/भोजन समिती/172 दिनांक: 29 OCT 2024

प्रथम मुदतवाढ

प्रति,
संबंधित पुरवठाधारक

विषय :– दरपत्रके पाठविण्याबाबत ..

**महोदय,**

आपणास विदितच आहे की, विद्यापीठाच्या 62 व्या विद्यापीठाच्या वर्धापन दिनाच्या अनुषंगाने दिनांक 18 नोव्हेबर, 2024 रोजी विद्यापीठामध्ये साजरा होणार आहे. सदर सोहळयास उपस्थित मान्यवरांसाठी शाकाहारी भोजन व्यवस्था करण्याची असून त्यासाठी अपेक्षित भोजनाचे मेनू सोबत जोडले आहेत.

सोबत दिलेल्या मेनुंचा विचार करता सध्या बाजारभावानुसार जे दर अपेक्षित आहेत. त्याप्रमाणे यापुर्वी दि.15.10.2024 रोजी दरपत्रके मागविण्यात आली होती परंतू सदर नोटीशीला आवश्यक तेवढा प्रतिसाद न मिळाल्याने पुनःश्च दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

त्यानुसार सदरची दरपत्रके दिनांक 5/11/24 पूर्वी विद्यापीठ कार्यालयामध्ये खोली कमांक 134 भांडार विभाग येथे समक्ष येवून जमा करावीत. सदरची दरपत्रके सादर करतेवेळी सोबतचे अटी व नियम लागू राहतील.

दरपत्रके सादर करतेवेळी बाजारभावाप्रमाणे वाजवी (Reasonable) दर देण्यात यावा. यामध्ये जर अति कमी किंवा अति जास्त दर सादर केलेस दरपत्रके नाकारण्याचे संपूर्ण अधिकार विद्यापीठास असतील. उपस्थितांची जेवणाची सोय दरसाल प्रमाणे अतिथीगृहाच्या भोजन कक्षामध्ये तसेच बाजूच्या लॉन मध्ये करण्यात येणार असून त्या ठिकाणी टेबल, खुर्च्या त्याचे फिल, आवश्यकतेनुसार कनात व मंडप लावणेत येईल त्यानुसार आवश्यक ठिकाणी मंडप, कनात व टेबल फिल, हात धुण्याचे बेसिन, फॅन ची सोय विद्यापीठ प्रशासनामार्फत करण्यात येईल.

1. पुरवठा करण्यात येणारे भोजनाचे मेनू यासाठी आवश्यक साहित्य (उदा. भाज्या, डाळी, तेल, तांदुळ, मसाले) हे उच्च प्रतिचे वापरणे आवश्यक आहे.
2. प्रत्यक्ष भोजना दिवशी उपस्थित वाढपी यांनी स्वच्छ एकसारखे ड्रेस, डोक्याला कॅप, ग्लोव्हज वापरणे आवश्यक आहे.
3. जेवणासाठीची भांडी स्वच्छ असावीत तसेच ताटे, वाटया स्वच्छ व चांगल्या प्रतिचे असावेत (प्लॅस्टिक अथवा हलक्या मटेरीयल चे वापरू नयेत)
4. पिण्याचे ग्लास कागदी असावेत, तसेच आईस्क्रिम साठी वारण्यात येणारे कप कागदी असावेत चमचे लाकडी असावेत (प्लॅस्टिक कप चमचे वापरू नयेत)
5. भोजनाची जागा भोजनापूर्वी स्वच्छ देण्यात येईल तथापी भोजनानंतर सदरचा परिसर स्वच्छ करून देणे आवश्यक राहील
6. बीले सादर करतेवेळी विद्यापीठ लेखा नियमानुसार फुड लायसन्स, पॅन कार्ड, जीएसटी कमांक इ. आवश्यक बाबी तपासल्या जातील. तसेच दरपत्रक सादर करतेवेळी सदरबाबतची कागदपत्रे दरपत्रकासोबत जोडण्यात यावीत.
7. दरपत्रके उघडण्यादिवशी आपणास भ्रमणध्वनीद्वारे बोलविण्यात येईल. त्यावेळी प्रत्यक्ष हजर राहणे आवश्यक आहे.
8. सदरचे भोजन हे बुफे पद्धतीने करावयाचे असून एकूण 120 लोक भोजनासाठी उपस्थित राहणार आहेत. त्यानुसार किमान 02 बुफे स्टॉल अपेक्षित असून विद्यापीठाचे अधिकारी व पाहूणे यांचेसाठी प्रत्यक्ष जागेवर भोजन वाढावे लागणार आहे. त्यानुसार भोजन पुरवठा प्रत्यक्ष जागेवर करावा लागेल.
9. भोजनाची वेळ व प्रत्यक्ष संख्या याबाबत कार्यक्रमाआधी तीन ते चार दिवस कळविण्यात येईल.
10. भोजनाचा मेनू पुढीलप्रमाणे राहील

| |
|---|
| मेनू |
| स्टार्टर पनीर |
| पंजाबी भाजी व्हेज हंडी |
| पंजाबी / महाराष्ट्रीन भाजी |
| ग्रीन सलाड / कोशींबीर |
| शाही खीर (रजवाडी खीर गुलाबजामून सहीत) / गुलकंद रबडी |
| मिनी बटाटेवडा / कटलेट |
| फुलका / मिनी चपाती / पुरी |
| ग्रीन चटणी |
| व्हेज पुलाव / खुष्का राईस |
| डाळ तडका / डाळ फ्राय |
| लोणचे, पापड, मीठ, लिंबु, मुखवास |
| आईस्क्रिम |
| मिनरल वॉटर |

11. सदर दरपत्रक दोन लिफाफा पध्दतीने (तांत्रिक व दराची दरपत्रक) भरावयाची आहे सदर दोन लिफाफा पध्दतीत अंतर्भाव असलेल्या बाबी पुढीलप्रमाणे– अटी व नियम :–

**लिफाफा क्र.1. तांत्रिक निविदेचा लिफाफा**

1. संस्था नोंद प्रमाणपत्र / 2. अन्न व औषध विभागाकडील प्रमाणपत्र 2. ग्रांहकांची यादी /अनुभव

2.. संस्थचे / ठेकेदाराचे पॅन कार्ड 4. वस्तू व सेवा कर (GST) नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**लिफाफा क्र. 2. दरपत्रकाचा लिफाफा**

1. दर नमूद केलेली आणि स्वाक्षरी व शिक्क्यासह असलेली दराची प्रत (जोडपत्र 'ब') सर्व करासहित व विद्यापीठ पोहोच.

उपकुलसचिव
तथा समिती प्रमुख भोजन समिती,
व र्धापन दिन,2024

rs\STORE\Desktop\18th november 2024\submission.docx